# “मराठी दिवस”

**वाघ म्हणतात मराठी जातीला,**
**कपाळी लावतो महाराष्ट्राच्या मातीला।**
**डोंगराशी भिडवतो छातीला,**
**तोड नाही जगात कुठे आमच्या हिमतीला।**
**आम्ही रक्त पाजतो स्वतःचे तलवारीच्या पातीला,**
**कारण पुजतो फक्त शिवछत्रपतींना।**
**जय मराठी॥ जय महाराष्ट्र॥**



सालाबाद प्रमाणे ‘द बिशप्स स्कूल कॅम्प, पुणे’ तर्फे या वर्षीही दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजी, मराठी भाषेची अस्मिता जपण्याच्या हेतूने मराठी दिवस दिमाखदार पद्धतीने साजरा करण्यात आला. मराठी दिवसाचे औचित्य साधून शालेय परिपाठ मराठीत सादर करण्यात आला.



मराठी दिनानिमित्त आयोजित संस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात दीपप्रज्वलाने करण्यात आली. आमच्याच प्रशालेतील इयत्ता ८ वी अ च्या प्रथम मोदी या विद्यार्थ्यांने आपल्या नृत्याने गणेश वंदना करीत कार्यक्रमाचा श्रीगणेश केला.

कार्यक्रमाच्या सूत्र संचालनाचे काम इयत्ता आठवीचे विद्यार्थी राज निर्वाणे व भव्य शाह यांनी पार पाडले.

सर्व प्रेक्षकांच्या मनात मराठीची उर्मी निर्माण करणारे समूहगीत 'ही मायभूमी ही जन्मभूमी ....' हे समूह गीत इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केले.
इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी काही हास्य, काही वैचारिक कविता प्रस्तुत करून आपल्या काव्य प्रदर्शनाने सर्वांना तृप्त केले.
इयत्ता दहावीचा विद्यार्थी पार्थ दांगट यांनी 'शेपटा' ही हास्यकविता सादर करत सर्वांना हसवून बेहाल केले.
दिशांत अरगडे व अर्णव वालगुडे या विदयार्थ्यांनी सादर केलेल्या, पोवाड्यांनी सर्व उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांच्या अंगावर अक्षरशः शहारे उभे राहिले.




शाळेच्या मराठी विभागाच्या शिक्षिका **सौ. प्राची अगरवाल** यांचे स्वलिखित **'संत ज्ञानेश्वर'** यांच्या जीवनातील काही प्रसंगांवर आधारित नाटकाने तर प्रेक्षक वर्ग खरेच संतांच्या पवित्र वाणीने भक्तीरसात चिंब होऊन निघाले.

अद्वैत कुलकर्णी या विद्यार्थ्याने आभार प्रदर्शनाचे काम पार पाडत कार्यक्रमाची सांगता केली.



**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,**
**धर्म,पंथ जात एक जाणतो मराठी,**
**बोलतो मराठी, ऐकतो मराठी,**
**जाणतो मराठी, मानतो मराठी..........**



**मराठी विभाग**
**श्रीमती वर्षा यादव**